संचालनालय, लेखा व कोषागारे, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन,

कस्तुरी इमारत, तळ मजला, ज. टाटा मार्ग,

पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

दुरध्वनी क्रमांक ०२२ २२६२२०३६ ई-मेल आयडी **:** aao.prashakosha-mh@gov.in

---

-: जाहिरात :-

गट "ब" संवर्गातील सेवानिवृत्त लेखा अधिकारी अधिकाऱ्यांची करार तत्त्वावर नेमणुक करणेबाबत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र. १००/१३, दि. १७.१२.२०१६ अन्वये शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबतची कार्यपद्धती विहित केलेली आहे. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील "लेखा अधिकारी" या गट "ब" संवर्गाच्या पदाकरिता आवश्यकतेनुसार १ सेवानिवृत्त अधिकारी यांची कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करावयाची आहे.

	विभाग	कार्यालयाचे नाव व पत्ता
१.	मुंबई	राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, पहिला मजला, ४८/५४, कुशेष मॅन्शान, जन्मभूमी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.

१. कंत्राटी तत्त्वावर नेमलेल्या सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांचे पदनाम "समंत्रक" असे राहील. सदर पदावर नियुक्ती करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांनी खालील कामे करणे आवश्यक राहील.

   अ. केंद्र शासनाने दि. ३०.०३.२०२१ रोजीच्या अधिसूचनेमध्ये Central Civil Service (implementation of National Pension System) Rules, २०२१ निर्गमित केले आहे. त्याधर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी नियम तयार करणे.

२. या जाहिरातीद्वारे करावयाची नामिकासूची शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार करण्यात येईल व करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिका-यांना याच शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक देण्यात येईल. एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार कालावधीसाठी कायम राहील.

३. **गट "ब" लेखा अधिकारी संवर्गाच्या कंत्राटी समंत्रकांच्या निवडीकरीता इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी आपले विहित नमुना अर्ज संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात टपालाद्वारे / हस्तपोच तसेच** aao.prashakosha-mh@gov.in **या ईमेल आयडीवर विहित मुदतीत सादर करावेत.**

संचालनालय स्तरावर यासंबंधित कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. यापुर्वी महाकोषवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या नामिकासूचीबाबतच्या विविध जाहिरातींच्या अनुषंगाने "ब" संवर्गाच्या अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केलेले असल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाहीत. तरी संबंधितांनी अर्ज नव्याने सादर करावेत.

४. अर्ज सादर केला तरी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना काम मिळेल, याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही. अधिकाऱ्यांचा सदर कामकाजाचा व इतर प्रशासनिक कामाचा अनुभव व इतर अटी व शर्तींची पूर्तता यांचा विचार करून आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीकरीता वरील शासन निर्णयानुसार केवळ अकरा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात येईल.

५. अशा अधिकारी / कर्मचाऱ्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची / न्यायालयीन प्रकरणाची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

६. करार पद्धतीने अर्ज करताना अर्जदाराची कमाल वयोमर्यादा ही ६४ वर्षापेक्षा अधिक नसेल.

७. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवर सेवासमाप्त करण्याचा अधिकार राहील.

८. नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत संबंधित सहसंचालक अधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील व संचालक महोदयांसमोर अहवाल सादर करतील.

९. **सदर कामकाज हे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसंबंधी असल्याने आवश्यक त्या कामकाजाबाबत गोपनीयता राखण्याची जबाबदारी ही संबंधित अधिकाऱ्यांची राहील. गोपनीयता भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही क्षणी कोणतेही कारण न देता तात्काळ सेवासमाप्त करण्यात येईल.**

१०. अशा अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/ प्र.क्र. १००/१३, दि. १७.१२.२०१६ मधील व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

११. विहित नमुन्यातील अर्ज https://mahakosh.maharashtra.gov.in - DAT (mahakosh) - Careers या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. १३.०४.२०२२ पर्यंत राहील.

Sd/-

(वैभव राजेघाटगे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक :- ०५.०४.२०२२
ठिकाण :- मुंबई